पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
प्रशासन विभाग

# निवेदन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी/अस्थायी आस्थापनेवरील गट "ब" ते "ड" मधील पदे फक्त ६ महिने कालावधीकरीता दरमहा एकत्रित मानधनावर भरण्याकरीता जाहिरात क्रमांक १०६३/२०२१, दिनांक ०२/०९/२०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविणेत आले होते. त्यानुसार अर्ज सादर करणेचा शेवटचा दि.१७/०९/२०२१ असा निश्चित करणेत आला होता. तथापि वरील मुदतीमध्ये ज्या उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर केलेले आहेत अशा उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांचे अर्जाचे क्रमांक (Aplication Number) १२३६३ ते १२८५६ व १३०९२ ते १३७२० या दरम्यान भरलेले आहेत मात्र सदरचे Documents संगणक प्रणालीत दिसून येत नसल्याने अशा उमेदवारांनी अर्जाची प्रींट काढून तपासणी करावी. तसेच अशा अर्जातील माहिती परिपूर्ण नसल्यास अथवा अर्जाची प्रिंट प्राप्त होत नसलेस किंवा अन्य अडचणी येत असतील अशा अर्जदारांनी पुन्हा दि. २०/०९/२०२१ ते दि. २४/ ०९/ २०२१ (सायंकाळी ६.१५ पर्यंत) या कालावधीमध्ये जाहिरातीत नमूद केले प्रमाणे सर्व पूर्ततेसह पुन्हा नव्याने अर्ज ऑनलाईन सादर करण्यास मुदत देण्यात येत आहे. वरील नमूद क्रमांका व्यतिरिक्त (१२३६३ ते १२८५६ व १३०९२ ते १३७२०) ज्या उमेदवारांचे अर्ज परिपूर्ण करुन अपलोड झाले असतील अशा उमेदवारांनी पुन्हा अर्ज भरण्याची आवश्यकता असणार नाही. तसेच ज्या उमेदवारांना मुदतीत अर्ज भरणे शक्य झाले नाही त्यांना अर्ज भरण्यास मुदतवाढ अनुज्ञेय राहील.

ऑनलाईन अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी च्या प्राप्त गुणांची टक्केवारी या रकान्यामध्ये CGPA निकषाप्रमाणे टक्केवारी नमूद केली असेल अशा उमेदवारांनी टक्केवारी या रकान्यात स्पष्ट टक्केवारी नमूद करावी (उदा.65.48). त्याकरीता अर्ज दुरुस्तीसाठी Edit Application ची सुविधा दि. २०/०९/२०२१ ते दि. २४/ ०९/ २०२१ (सायंकाळी ६.१५ पर्यंत) राहील याची नोंद घ्यावी.

१८/०९/२१

(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

क्रमांक प्रशा/ २४ /कावि/ ४२ /२०२१
दिनांक - १८ /०९/२०२१